जिल्हाधिकारी कार्यालय,जालना
प्रशासकीय इमारत,स.नं.488,रिंग रोड,जालना

जा.क्र.2026/मशाका/सेतु/ए.एस.एस.के/प्र.क्र- दि.16.09.2026

जाहिर सूचना

आपले सरकार सेवा केंद्राकरीता जाहिरातीमधील मुळ पात्रता निकाषानुसार अर्जदार यांचे अर्जांची प्रार्थमिक छाननी करून निव्वळ तात्पुर्त्या स्वरुपातील पात्र व अपात्र उमेदवारांची यादी तयार करण्यात आलेली आहे.

त्यानुसार उमेदवारांनी त्यांचे लॉग-इनला जाऊन आपल्या अर्जाची स्थिती (application status) तपासावी. केंद्राचे प्रत्यक्ष तपासणीचे बाबतचे वेळापत्रक नंतर प्रसिद्ध केले जाईल. तरीही, कृपया कोणीही वारंवार कार्यालयास संपर्क साधु नये.

प्राथमिक छाननीतील खालील निकषांआधारे अर्ज पात्र करण्यात आलेले आहे.

१) अर्जासाठी आवश्यक फी रू.550/- भरलेली आहे.

२) उमेदवार १२ वी उत्तीर्ण आहे.

३) उमेदवार MS-CIT/ CCC (Course on Computer Concept) उत्तीर्ण आहे.

४) वयाबाबत पुरवा जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार शाळा सोडल्याचा दाखला (TC) जोडलेला आहे.

५) संबंधित ग्रामपंचायतीचा रहिवासी असल्यास अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) किंवा रहिवासी प्रमाणपत्र जोडले असल्यास.

अपात्रतेची कारणे

१) अर्जासाठी आवश्यक फी रू.550/- भरलेली नाही.

२) जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार व शासन निर्णय दि.०९/०७/२०२६ नुसार किमान शैक्षणिक पात्रता १२ वी उत्तीर्ण प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास.

३) शासन निर्णय दि.०९/०७/२०२६ नुसार MS-CIT किंवा समकक्ष CCC (Course on Computer Concept) प्रमाणपत्र जोडलेले नसल्यास.

४) वयाबाबत पुरवा जाहिरातीमध्ये नमुद केल्यानुसार शाळा सोडल्याचा दाखला (TC) जोडलेला नाही.

५) संबंधित ग्रामपंचायतीचा रहिवासी असल्याबाबतचे अधिवास प्रमाणपत्र (डोमिसाईल) किंवा गट ग्रामपंचायत करीता संबंधित ग्रामपंचायतीचे रहिवासी प्रमाणपत्र नसल्यास. किवा ग्रामपंचायतीचा रहिवासी असल्याचे डोमिसाईल असुन शहरी किंवा नगरपरिषद/नगरपंचायत करीता अर्ज केला असल्यास किंवा शहरी भागातील असुन ग्रामीण भागाकरीता अर्ज केला असल्यास.

६) पोलीस व्हेरिफीकेशन प्रमाणपत्रामध्ये गुन्हा दाखल असल्याबाबत नोंद असल्यास.

७) ग्रामपंचायत ऑपरेटर, ग्राम रोजगार सेवक, शासकीय निमशासकीय सेवेत असल्यास किंवा मानधन घेत असल्यास.

८) जागेसंबंधि कोणतेही जी.ओ.टॅग फोटो किंवा लोकेशन नसल्यास.

महत्वाची सुचना:- दि. १६/०९/२०२६ रोजी अर्जदार यांचे लॉगीनला प्रसिध्द करण्यात आलेल्या पात्र यादीनुसार उमेदवाराला आपले सरकार सेवा केंद्र मंजूर झाल्याबाबत कोणतेही हक्क सांगता येणार नाही. उमेदवाराने ऑनलाईन अर्जात नमुद केलेल्या गृहीत पात्रतेनुसार सदर पात्र/अपात्र उमेदवारांची यादी अर्जदार यांचे लॉगीनला प्रसिध्द करण्यात आली आहे. मुलाखतीचे वेळी मुळ कागदपत्रांच्या पुर्ण छाननीनंतरच उमेदवाराची पात्रता निश्चित करण्यात येईल. व तदनंतरच उमेदवारास प्रत्यक्ष मुलाखतीस पात्र करण्यात येईल. पात्रता धारण न करणा-या उमेदवारास आपले सरकार सेवा केंद्र वाटपाच्या कोणत्याही टप्यावर अपात्र करण्याचे अधिकार अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समितीकडे राखून ठेवण्यात आलेले आहेत व याबाबत उमेदवारास कोणतीही तक्रार करता येणार नाही.

(आश्रिमा मित्तल)
अध्यक्ष, जिल्हास्तरीय सेतु समिती,
तथा जिल्हाधिकारी, जालना

Scanned with OKEN Scanner